# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ च्या अंमलबजावणीबाबत**

**(१) २७८४ (०९-०४-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश** चव्हाण, **श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ प्रमाणे जमिनीचे विभाजन करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१४ मध्ये जिल्हाधिकारी लातुर यांच्याकडे लेखी मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी लातुर यांनी विहित मुदतीत कोणतीही सक्षम कार्यवाही न केल्याने तत्कालीन महसूल राज्यमंत्री यांनी शेतकऱ्यांची विनंती मान्य करुन त्यांना न्याय देण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी लातूर यांना सन २०१४-१५ दरम्यान दिला होता हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वेळोवेळी आदेश व मागणी करुनही शेतकऱ्यांना न्याय न देणाऱ्या संबंधित जिल्हाधिकारी व इतर यंत्रणाची चौकशी करुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती सक्षम उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०४-२०१६) :** (१), (२), (३) व (४) लोकप्रतिनिधींनी दिनांक ४.६.२०१४ रोजी ता.उदगीर येथील गट नं.११२ व ११६ मधील जमिनीचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ८५ प्रमाणे सहधारकांना हिस्याचे विभाजन करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन दिले होते.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक ६.६.२०१४ च्या पत्रान्वये तहसिलदार, उदगीर यांना कलम ८५ प्रमाणे विभाजनाची व चतु:सिमा निश्चितीची कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. तसेच लोकप्रतिनिधींचे सदर निवेदन मा.राज्यमंत्री (महसूल) यांच्याकडूनही पृष्ठांकनासह प्राप्त झाल्यावर सदर प्रकरणासंदर्भात योग्य ती कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी, उदगीर व तहसिलदार, उदगीर यांना जिल्हाधिकारी, लातूर यांच्या दिनांक ११.८.२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

या प्रकरणी तहसिलदार, उदगीर यांनी दिनांक २२.८.२०१४ च्या पत्रान्वये उप अधिक्षक, भुमि अभिलेख, उदगीर यांना पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

त्यानुषंगाने उप अधिक्षक, भूमि अभिलेख, उदगीर यांनी दिनांक ७.१०.२०१४ च्या पत्रान्वये मुळ अर्जदारास या प्रकरणात कलम ८५ (२) चे आदेश पारीत झाले नसून गट नं.११२ व ११६ मधील सर्व सहधारकांच्या संमतीने महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ८७ अन्वये पोटहिस्सा मोजणीची कार्यवाही प्रस्तावीत करता येते व त्याअन्वये ताबे वहिवाटी हिस्याप्रमाणे पोट हिस्सा कार्यवाही करून महसूली अधिकारी किंवा तहसिलदार यांचेकडे अंमल करण्याकरीता सादर करण्यात येते आणि त्याकरीता प्रस्तुत प्रकरणी याबाबत कार्यवाही करावयाची असल्यास गा.न.नं.७/१२ उतारे व सर्वांचे संमतीपत्र सादर करावे असे मूळ अर्जदारास कळविलेले आहे. तसेच तहसिलदार, उदगीर यांनीसुध्दा अर्जदार यांना दिनांक २७.१०.२०१४ च्या पत्रान्वये नमूद दस्तऐवज उपलब्ध करून देण्याबाबत कळविलेले आहे. तथापी, अर्जदार यांनी दिनांक २४.२.२०१६ पर्यंत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, उदगीर यांच्याकडे सहहिस्सेदारांची नावे, पत्ते आणि त्यांच्या हिस्यांची व्याप्ती व त्यासंबंधी कच्चा नकाशा सादर केलेला नाही.

तरी प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांना उपरोक्त नमूद कळविल्याप्रमाणे सहधारकांचे संमतीपत्र व इतर कागदपत्रे प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

**मेव्हणाराजा (ता.देऊळगावराज, जि.बुलढाणा) येथील संत चोखा मेळा यांच्या जन्मस्थळाच्या विकासासाठी कार्यवाही करण्याबाबत**

**(२) ४३१० (२३-०४-२०१५). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेव्हणाराजा (ता.देऊळगावराजा, जि बुलढाणा) येथील संत चोखा मेळा यांच्या जन्मस्थळाच्या विकासासाठी सामाजिक न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(२) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०४-२०१६) :** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बुलढाणा यांनी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांना पाठविलेला मेव्हणाराजा (ता.देऊळगांवराजा) जि.बुलढाणा येथील संत चोखा मेळा यांच्या जन्मस्थळाच्या विकासाबाबतचा प्रस्ताव सदर तिर्थक्षेत्र विकास योजना ही या विभागाशी संबंधीत नसल्याने आयुक्तांनी जिल्हा परिषदेकडे परत पाठविला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक तालुका व जिल्हा हद्दीतील काही गावांतील शेत जमिनींवर ब्रिटीश कालावधीपासून असलेल्या देवस्थान संस्थानाच्या नोंदी कमी करणेबाबत**

**(३) ५२७९ (१०-०४-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक तालुका व जिल्हा हद्दीतील मौजे देवळाली गांव, देवळाली कॅम्प, संसरीगांव, बेलतगव्हाण, वडनेर, पळसे इत्यादी गावांमधील शेत जमिनीवर ब्रिटीश कालावधीपासून असलेल्या देवस्थानाच्या नोंदी कमी करणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतजमिनीच्या रक्कमेची संस्थांना गरज राहिलेली नसतांनाही ७/१२ वरील संस्थांनाच्या नोंदीमुळे गरीब शेतक-यांना या जमिनी तारण ठेवून सरकारी संस्था वा बँकाकडून कर्ज घेणेस अडचणी येतात व शेतीचाही विकास करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त अडचणीमुळेच शेतक-यांना त्यांची कौटुंबिक गरज भागविणेकरिता अत्यंत अल्पदरात त्यांच्या शेतजमिनी विकणे भाग पडते आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मागणीबाबत शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०४-२०१६) :** (१) होय.
(२), (३) व (४) देवस्थान जमिनींमध्ये वहिवाट करणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन तारण ठेवुन सरकारी संस्थाकडून कर्ज घेण्यात अडचणी येतात, याबाबतची तक्रार कधीही जिल्हाधिकारी, नाशिक यांचे कार्यालयात प्राप्त झालेली नाही. देवस्थान जमिनीच्या संदर्भात तत्कालीन राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीचा अहवाल शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. अहवाल स्विकृतीनंतर अहवालातील शिफारशींबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**भडगांव (जि.जळगांव) शहरातील सेतु सुविधा केंद्र सुरू करण्याबाबत**

**(४) ६५८८ (१६-०४-२०१५). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव (जि.जळगांव) शहरातील सेतु सुविधा केंद्रांचा दोन वर्षाचा करार संपल्याने माहे डिसेंबर, २०१४ पासुन हे केंद्र बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्र बंद असल्याने ग्रामस्थांचे मोठया प्रमाणात हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सेतु सुरु करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०४-२०१६) :** (१), (२) व (३) सेतु केंद्र चालकासोबत केलेला करार संपल्याने डिसेंबर, २०१४ पासुन सेतु सुविधा केंद्र बंद होते. तथापि, भडगांव तालुक्यात १६ महा-ई-सेवा केंद्रामार्फत जनतेस सेवा सुविधा पुरविण्यात येत होत्या. सेतु सुविधा केंद्र चालविण्यासाठी नव्याने जाहिराती देवून निविदा प्रक्रियेतून नविन संस्थेची निवड करण्यात येवून दिनांक ५/६/२०१५ रोजी यासंदर्भात करार करण्यात आला. तद्नंतर भडगांव येथील सेतु सुविधा केंद्र दिनांक ६/८/२०१५ पासुन सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीमती अनिता प्रकाश वाणी यांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर केलेल्या नियुक्तीस मान्यता देण्याबाबत**

**(५) ७३०८ (४-८-२०१५). श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरांडी (ता.तिरोळा, जि.गोंदिया) येथील प्रगती विद्यालयात कनिष्ठ लिपीक पदावर कार्यरत असतांना श्रीमती अनिता प्रकाश वाणी यांचे पती दिनांक १९ जुलै, २०१२ रोजी वा त्या सुमारास मृत पावले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर केलेल्या नियुक्तीस मान्यता देण्यासाठी शिक्षण विभागाने निर्णय न घेतल्याने त्यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे याचिका दाखल केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयानी याचिकेवर निर्णय देऊन १ महिन्यात शिक्षण विभागाने निर्णय घेण्याचे निर्देश दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशान्वये त्यांच्या नियुक्तीस शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०४-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय, श्रीमती वाणी यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र.४०४३/१४ दाखल केली होती. सदर याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.५.५.२०१५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार श्रीमती वाणी यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद गोंदिया यांच्या दि.१२.६.२०१५ च्या आदेशान्वये कनिष्ठ लिपीक या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीस मान्यता दिली आहे. सदर बाब दि.२१.११.२०१४ अन्वये शपथपत्राद्वारे मा.उच्च न्यायालयास कळविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या प्रस्तावित रस्ते सुरक्षा विधेयक २०१४ च्या विरोधात चक्का जाम आंदोलन केल्याबाबत**

**(६) ७७२८ (३१-७-२०१५). श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.अनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या प्रस्तावित रस्ते सुरक्षा विधेयक २०१४ च्या विरोधात राज्यातील रिक्षा, बेस्ट, टॅक्सी, एस.टी.संघटनांनी दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास चक्का जाम आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१६) :** (१) व (२) केंद्र शासनाच्या प्रस्तावित रस्ता सुरक्षा विधेयक २०१४ च्या विरोधात दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी विविध वाहतूक संघटनांनी संप पुकारला होता. राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत राज्यातील वाहतूक संघटनांना या संपामध्ये सहभागी न होण्याचे आव्हान करण्यात आले होते. तसेच, संघटना बंदमध्ये सहभागी झाल्यास जनतेची गैरसोय होवू नये म्हणून स्थानिक स्तरावर शक्य त्या उपाययोजना करण्याची सूचनाही प्रादेशिक परिवहन कार्यालयांना देण्यात आली होती. राज्यातील बहुतांशी वाहतूक संघटना सदरच्या संपामध्ये सहभागी झाल्या नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंब्रा (जि.ठाणे) येथे ट्रक उलटून वायु गळती झाल्याबाबत**

**(७) ८३८९ (३१-७-२०१५). श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) येथे अमोनिया वायु घेवून जाणारा ट्रक उलटून वायु गळती होणे तसेच मुंबई-गोवा हायवेवर पेणजवळ दोन ट्रकच्या झालेल्या भीषण धडकेनंतर गॅस सिलिंडरने भरलेल्या ट्रकचा स्फोट होऊन अग्निकल्लोळ झाल्याच्या घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे शहरे व हायवे धोकादायक बनली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हायवे रोडवरुन होणारी रासायनिक धोकादायक ट्रकच्या वाहतुकीबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन हे अपघात रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) धोकादायक व जोखमीच्या मालवाहतूकीबाबत केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम क्र.९ व नियम क्र. १२९ ते १३७ या नियमांनुसार कार्यवाही केली जाते.

या नियमांनुसार धोकादायक व जोखमीच्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या चालकांनी शासनमान्य संस्थांमार्फत अशा प्रकारची वाहतूक करण्यासंदर्भातील प्रशिक्षण घेतलेले असणे बंधनकारक आहे व प्रशिक्षणानंतर त्या चालकांच्या लायसन्सवर प्रशिक्षण घेतल्याची नोंद केली जाते. अशा प्रशिक्षणाशिवाय जोखमीची मालवाहतूक करणाऱ्या वाहनांच्या चालक व मालकांवर नियमांनुसार कारवाई करण्यात येते.

त्याशिवाय धोकादायक मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचे मार्ग ठरवून दिले जातात व जी.पी.एस. प्रणालीद्वारे अशा वाहनांवर नजर ठेवली जाते. अपघात झाल्यास संबंधित मालवाहतूक करणारी कंपनी आवश्यक त्या उपाययोजना करते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील शासकीय व महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये**
**लहान बाळांना देण्यात येणाऱ्या इंजेक्शनच्या सिरीजबाबत**

**(८) ८७८० (०३-०८-२०१५). श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जन्माला आलेल्या बाळाला ९ आणि १५ वा महिन्यात गोवरचे इंजेक्शन देण्यात येते. यासाठी नियमाने २६ क्रमांकाची सिरींज वापरणे गरजेचे असते पण नाशिक येथील शासकीय व महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये मात्र २३ क्रमांकाची सिरीज वापरली जात असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शन आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०३-२०१६) :** (१) बाळाला गोवरचे इंजेक्शन देण्यासाठी केंद्र शासनाने प्रमाणित केलेल्या २३ क्रमांकाच्या एडी सिरींज वापर करण्यात येतो. २६ क्रमांकाच्या सिरीज वापरण्याबाबत सूचना केंद्र शासनाने दिलेल्या नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईत आरटीओने भंगारात काढलेल्या रिक्षा, टॅक्सी बेकायदेशीरपणे सुरु असल्याबाबत

**(९) ९४६० (३०-७-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत आरटीओने भंगारात काढलेल्या रिक्षा, टॅक्सी थोडीफार दुरुस्त करुन मुंबई व उपनगरात बेकायदेशीरपणे सुरु असल्याचे माहे जून, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आरटीओने भंगारात काढण्यात आलेल्या रिक्षा, टॅक्सी मुंबई व उपनगरात बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०४-२०१६) :** (१) होय. मुंबई (पश्चिम) व मुंबई (पूर्व) विभागांत तुरळक प्रमाणात आरटीओने भंगारात काढलेल्या ऑटोरिक्षा रस्त्यांवर चालविल्या जात असलेल्या आढळल्या.

(२) व (३) मुंबई (पश्चिम) व मुंबई (पूर्व) या विभागांतील प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडील वायुवेग पथकांमार्फत व विशेष तपासणी पथकांमार्फत नियमितपणे तपासणी करुन अनधिकृतपणे चालविल्या जाणाऱ्या ऑटोरिक्षा व टॅक्सींवर कारवाई केली जाते.

उपरोक्त दोन्ही विभागांत जून, २०१५ मध्ये ऑटोरिक्षा व टॅक्सींची विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली. त्यामध्ये एकूण ८८८६ वाहने तपासण्यात आली असून त्यात ३३९५ वाहने दोषी आढळली आहेत. दोषी वाहनांकडून एकूण रु. १४.९६ लक्ष एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच सदर तपासणी मोहिमेत नोंदणी रद्द झालेल्या २३ ऑटोरिक्षा आढळल्यचा असून त्या जप्त करुन त्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हेळवाक (ता.पाटण, जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील एम.बी.बी.एस. दर्जाचे रिक्त पद भरण्याबाबत

**(१०) ९५०४ (०३-०८-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेळवाक (ता.पाटण, जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला एम.बी.बी.एस. दर्जाचे पद मंजूर असताना या पदावर मागील दोन वर्षापासून बी.एच.एम.एस.दर्जाचा वैद्यकीय अधिकारी काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बी.एच.एम.एस. दर्जाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचाही कालावधी संपुष्टात येत असल्याने या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रुग्णांना आरोग्य सेवा मिळावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, हेळवाक, ता.पाटण, जि.सातारा येथे बी.ए.एम.एस.दर्जाचे एक वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे.
(२) होय.

प्राथमिक आरोग्य केंद्र, हेळवाक येथे एकमेव बी.ए.एम.एस. अस्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे. रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांना पुनर्नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिनांक ३०.६.२०१६ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.
(३) व (४) रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्यासाठी सदर आरोग्य संस्थेमध्ये वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्याकरिता नामनिर्देशनाने पदे भरण्याबाबत कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील बाजार समितीमध्ये पिकांवरील प्रक्रिया उद्योग सुरु करण्याबाबत**

**(११) ९५०६ (२९-०७-२०१५). श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाजार समित्यामधील अन्नधान्य, फळे व भाजीपाला इत्यादि मुख्य पिकांवर प्रक्रिया करण्यासाठी यवतमाळ जिल्हयातील १७ बाजार समित्यांनी आपल्या मूळ अर्थसंकल्पात तरतूद करुन सदर प्रस्ताव पुणे येथील कृषी पणन मंडळाकडे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर माल परजिल्हयात किंवा परराज्यात प्रक्रीयेसाठी नेला जातो व तोच माल पुन्हा यवतमाळ जिल्हयातील नागरिकांना चढया भावाने विकला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यवतमाळ जिल्हयातील बाजार समितीमध्ये सदर पिकांवरील प्रक्रिया उद्योग सुरु केल्यास शेतकऱ्यांना रोजगार व नागरिकांना योग्य दरात शेतमाल मिळू शकेल या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०५-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुरुंदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(१२) १००२४ (०३-०८-२०१५). श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरुंदा येथील २५ हजार लोकवस्ती असलेल्या गावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नियुक्त केलेले २ वैद्यकीय अधिकारी गेल्या २ महिन्यांपासून रजेवर असल्याने सर्वसामान्य रुग्णांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, आरोग्य केंद्रामध्ये नियमित वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ती करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरुंदा येथील दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी एक वैद्यकीय अधिकारी दिनांक ३.३.२०१५ ते २८.३.२०१५ या कालावधीत प्रकृती अस्वास्थ्यामुळे रजेवर होते. त्या कालावधीत तेथे अन्य वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते व त्यांच्यामार्फत रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येत होती.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरुंदा येथे २ स्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बेकायदा गर्भलिंग निदान रोखण्याबाबत**

**(१३) १०४०४ (३-८-२०१५). श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेकायदा गर्भलिंग निदान रोखण्यासाठी गर्भलिंग निदान व परिरक्षण प्रतिबंधक कायदयांतर्गत प्रत्येक सोनोग्राफी सेंटरसाठी कडक नियम व अटी लागू केल्या आहेत पण या नियमांचा आधार घेत सोनोग्राफी सेंटर्समधील डॉक्टरांना खूप त्रास दिला जात असल्याचा आरोप इंडियन सोनोलॉजिस्ट ॲण्ड गायनॉकॉलॉजिस्ट असोसिएशनने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सोनॉलॉजिस्ट व गायनॉकॉलॉजिस्ट यांनी या विरुध्द दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी आझाद मैदानावर जाहीर सभा घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोनॉलॉजिस्ट व गायनॅकॉलॉजिस्ट असोसिएशनने केलेल्या उक्त मागणीबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-४-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) व (४) सर्व समुचित प्राधिकारी यांनी सर्व ठिकाणी कायद्याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी सोनोग्राफी केंद्र धारक व समुचित प्राधिकारी यांना काय करावे व काय करुन नये याबाबत कळविले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक व निवासी वैद्यकीय अधिकारी यांच्या बैठकीत आणि व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सोनोग्राफी व वैद्यकीय गर्भपात केंद्राच्या तपासणीवेळी केंद्रधारकांना नाहक त्रास न देण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खेडेश्वर या तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या निवासस्थानाच्या व कार्यालयाच्या इमारती ताब्यात घेण्याबाबत**

**(१४) १०४४७ (३०-०७-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, ॲड.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खेडेश्वर या तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या निवासस्थानाच्या व कार्यालयाच्या इमारती शासनाने त्वरीत ताब्यात घेण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे, अमरावती यांना दिनांक ४ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०४-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) चांदुर रेल्वे उपविभागांतर्गत एकुण १३६ मंडळ अधिकारी/तलाठी निवासस्थाने व कार्यालय बांधकामे प्रस्तावीत आहेत. पैकी ९८ मंडळ अधिकारी/तलाठी निवासस्थाने व कार्यालये ताब्यात घेतली आहे. उर्वरित ३८ मंडळ अधिकारी व तलाठी निवासस्थाने व कार्यालयाचे बांधकाम पुर्ण होताच ताब्यात घेण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील कोट्यवधी रुपयांच्या कामांची बिले प्रलंबित असल्याबाबत**

**(१५) ११११८ (२३-१२-२०१५). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे मागील तीन ते चार वर्षापासून कोट्यवधी रुपयांची कामे करण्यात आली असून त्यापैकी १ हजार कोटी रुपयांच्या कामांची बिले प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची चौकशी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) तीन वर्षापेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या देयकांचा आढावा घेण्यात आला असून, प्रामुख्याने पर्याप्त निधी अभावी देयके प्रलंबित असल्याचे दिसून येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील तलाठी व कोतवालांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१६) ११२३४ (२१-१२-२०१५). आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे : दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ८१५७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढती लोकसंख्या आणि ग्रामीण भागाचा होत असलेला विस्तार लक्षात घेऊन महसूल विभागाने कोतवाल, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांची एकूण ६ हजार ६८२ पदे नव्याने निर्माण करुन शासन ती भरण्याच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण (जि.रायगड) येथील मागील ४-५ वर्षापासून कोतवाल या पदांची भर्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगांव (जि.बुलढाणा) येथील तहसिल कार्यालयात किती तलाठ्यांची पदे रिक्त आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :** (१) राज्यातील तलाठी साझांची पुनर्रचना समितीने सादर केलेल्या अहवालानुसार करण्यात येणाऱ्या तलाठी साझांच्या पुनर्रचनेअंतर्गत ३०८४ एवढ्या नवीन तलाठी साझे स्थापन करण्याचे प्रस्तावित असून त्याकरीता कोतवाल, तलाठी व मंडळ अधिकारी यांची पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावावर वित्त विभागाशी विचार विनिमय करुन उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(२), (३) व (४) रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यामध्ये कोतवालांच्या ८ रिक्त पदांसह जिल्ह्यातील एकूण ९३ कोतवालांची पदे भरण्याकरिता जिल्हाधिकारी, रायगड यांचेस्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे. त्याकरीता दिनांक ३०.१.२०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांचेमार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव तहसिल कार्यालयांतर्गत तलाठ्यांची ३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त प्रभार नजीक साझांच्या तलाठ्यांकडे तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यात उद्योग समूह, कंपन्या आणि अन्य व्यक्तींकडे असलेली हजारो एकर जमीन मुक्त करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१७) ११६२४ (२३-१२-२०१५). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात बडे उद्योग समूह, कंपन्या आणि अन्य व्यक्तींकडे असलेली हजारो एकर जमीन कमाल नागरी जमीन धारणा कायद्यातील (युएलसी) निर्बंधामधून प्रीमियम आकारुन मुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, केलेल्या अंमलबजावणीचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०४-२०१६) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील शेतजमिनीची पुर्नमोजणी करण्याबाबत**

**(१८) ११६९८ (२१-१२-२०१५). श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयामध्ये सन १९८० पासून शेतजमिनीची पुर्नमोजणी झाली नाही, त्यामुळे अनेक शेतक-यांच्या जमिनीची गाव नकाशात नोंद नाही. लाखनी आणि साकोली तालुका भूमी अभिलेख कार्यालयात नकाशा दुरूस्ती सीमांकन निश्चित करणे व पोटहिस्सा मोजणीची सर्वाधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखनी आणि साकोली तालुक्यात (जि.भंडारा) महाराजस्व अभियानाद्वारे शेतक-यांचे भूमी अभिलेख कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे, नकाशा दुरूस्ती सीमांकीत निश्चित करणे, गाव नकाशामध्ये नोंद घेणे आणि शेतक-यांचे अतिक्रमण पट्टे वनदावे मंजूर करण्यात यावे अशी मागणी या तालुक्यातील शेतक-यांनी उपविभागीय अधिका-यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०४-२०१६) :** (१),(२),(३) व (४) भंडारा जिल्ह्यामध्ये १९८० पासून पुनर्मोजणी न झाल्याची बाब खरी नाही. भंडारा जिल्ह्यातील ८५७ गावामध्ये सन १९७४ ते १९९९ पर्यंत पुनर्मोजणीची कामे करण्यात आलेली आहेत.

भूमि अभिलेख कार्यालय, साकोली येथे शेतकऱ्यांची नकाशा दुरुस्ती, गाव नकाशा नोंद, पोटहिस्सा मोजणीची असंख्य प्रकरणे प्रलंबित असल्याचे निवेदन शेतकऱ्यांकडून प्राप्त झाले आहे. परंतू माहे जानेवारी, २०१६ अखेर लाखनी व साकोली तालुक्यातील पुनर्मोजणी तक्रार अर्ज (उदा.नकाशा दुरुस्ती, क्षेत्र दुरुस्ती व नाव दुरुस्तीबाबत अर्ज) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लाखनी व साकोली कार्यालयाकडे शिल्लक नाहीत.

जानेवारी, २०१६ अखेर लाखनी तालुक्यात हद्द कायम करण्याची १९ प्रकरणे, पोटहिस्सा मोजणीची १० प्रकरणे आणि साकोली तालुक्यात हद्द कायम करण्याची १३ प्रकरणे व पोटहिस्सा मोजणीची ४ प्रकरणे शिल्लक असून सदरची सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी शेतकऱ्यांचे वनदाव्यांबाबत साकोली उपविभागातील तालुका साकोली/लाखनी/लाखांदुर येथील वनहक्कांचे १२२७८ दाव्यांबाबत कागदपत्रांची पुर्तता नसल्यामुळे तसेच अतिक्रमित जमिनी वनजमिनी नसल्यामुळे उपविभागीय स्तरीय समिती साकोली यांनी दावे अमान्य केले आहेत. सदर दावे अमान्य करण्यात आल्याबाबतची कारण संबंधित दावेदारांना कळविण्यात आले असून याबाबत जिल्हास्तरीय समिती भंडारा यांच्याकडे अपील दाखल करण्यास सुध्दा कळविण्यात आले आहे.

---

### परभणी येथील सर्व्हे नं.२ मधील जमीन गैरव्यवहाराबाबत

**(१९) ११७८७ (२१-१२-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सर्व्हे नं.२ मधील सुमारे १०० कोटी रुपयांचे मुल्य असणाऱ्या ८ एकर १६ गुंठे ईनामी जमिनीवर झालेल्या अतिक्रमण प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक २९ जून, २०१५ रोजी दिलेल्या अहवालाप्रमाणे परभणी जिल्हा दुय्यम निबंधक, आयुक्त महानगरपालिका, अधीक्षक, भूमि अभिलेख, तहसिलदार यांना कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील सर्व अधिकाऱ्यांनी कार्यवाही व अहवाल न दिल्याने त्यांना दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, परभणी यांनी स्मरणपत्र देऊन कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या जमिनीवर अतिक्रमणे हटवून योग्य ती कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व यंत्रणा यांच्या संशयास्पद कामगिरीची चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच अतिक्रमणे हटविण्याबाबत व दोषींवर कारवाई करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०५-२०१६) :** (१), (२), (३) परभणी येथील स.नं. २ मधील ८ एकर १६ गुंठे इनामी जमिनीवरील अतिक्रमणाबाबत अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठित करुन चौकशी करण्यात आली आहे. या समितीच्या चौकशी अहवालाआधारे जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक ०७.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना खालील स्वरुपाचे निर्देश दिले आहेत.

(i) जिल्हा दुय्यम निबंधक, परभणी यांनी परभणी येथील सर्व्हे नं. २ मधील खरेदी-विक्रीचे व्यवहार थांबविणे.

(ii) आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांनी सदर सर्व्हे नं. मधील बांधकाम थांबवून "जैसे थे" परिस्थिती ठेवणे आणि कर व बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे.

(iii) अधिक्षक, भूमी अभिलेख, परभणी यांनी आखीव पत्रिकांतील नोंदीची तपासणी करुन स.नं. २ च्या संदर्भात इनाम जमीन म्हणून नोंद घेणे, फेरफार घेतेवेळी इनाम नोंद कायम न ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे.

(iv) तहसिलदार, परभणी यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील प्रलंबित रिट याचिका क्र. ४०६१/२०१५ मधील नमूद क्षेत्र वगळता स.नं. २ मधील उर्वरित जमिनीवरील अनधिकृत ताबा असलेल्या व्यक्तींची चौकशी करुन सदर जमीन शासनाच्या व्यवस्थेखाली घेण्याची कार्यवाही करावी.

(v) उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी स.नं. २ या इनाम जमिनीच्या विरासत मंजूरीबाबत कार्यवाही झाली नसल्यास सदर जमीन नियमानुसार ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करावी.

जिल्हाधिकारी, परभणी यांच्या उक्त आदेशांची अंमलबजावणी व कार्यवाही होत नसल्याबाबत तसेच इनामी जमिनीवरील अतिक्रमण करणाऱ्यांना व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची तक्रार दि.१७.०२.२०१६ रोजी शासनास प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांचा अहवाल मागविला असता दिनांक ०५.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, परभणी यांनी

शासनास अहवाल सादर केला आहे. या अहवालानुसार जिल्हा दुय्यक निबंधक, परभणी यांनी स.नं. २ मधील जमिनीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार थांबविले आहेत.

आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांनी ४ अनधिकृत बांधकाम धाराकांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, परभणी यांनी ७५ आखीव पत्रिकांच्या संदर्भात फेरतपासणी पूर्ण केली आहे. त्यापैकी २३ प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल झाल्या असून प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी विरासतीचे प्रकरण नामंजूर केले आहे.

तहसिलदार, परभणी यांनी स.नं. २ मधील जमीन शासन व्यवस्थेखाली घेण्याकरीता २४१ मिळकत धारकांना नोटीसा दिल्या आहेत. त्यापैकी ३१ मिळकतधारकांनी दिवाणी न्यायालयात दावे दाखल केले असून ते न्यायप्रविष्ठ आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत: जि.पुणे व ता.राजापूर (जि.रत्नागिरी) येथील देवस्थान इनाम जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत**

**(२०) ११९७४ (२१-१२-२०१५). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: जि.पुणे व ता.राजापूर (जि.रत्नागिरी) या शहरी व ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात देवस्थान इनाम जमिनी म्हणून नोंद करण्यात आली असून या जमिनीवर रहिवाशी मागील २०० वर्षाहून अधिक कालावधीपासून राहत असूनही त्यांची ७/१२ ला नोंद करण्यात आली नसल्यामुळे सध्या राहत असलेली घरे अतिशय धोकादायक झाली असून त्यांना घरे दुरूस्ती करण्यास परवानगी मिळत नाही. यामुळे या रहिवाशांना जीव मुठीत घेऊनच या मोडकळीस व धोकादायक घरात रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील अनेक गावांमध्ये देवस्थानच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून या जिल्हयातील १९ हजार ३५ हेक्टर जमीन देवस्थानकडे असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील देवस्थान ईनामाच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावांवर करण्यासंदर्भात शासनाने नेमलेल्या अभ्यास समितीकडून प्राप्त झालेल्या अहवालाची सुरू असलेली छाननी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील देवस्थान ईनामाच्या अहस्तांतरणीय जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत व त्याची ७/१२ ला नोंद करण्याबाबत तसेच जमिनीची त्यांना मालकी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०४-२०१६) :** (१) पुणे जिल्ह्यातील अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात देवस्थान इमान म्हणून नोंद असलेल्या मिळकती असून त्यामध्ये तेथील रहिवासी मागील कित्येक वर्षापासून वहिवाट करीत आहेत. सदर जमिनी देवस्थान इमान असल्यामुळे त्यांचे हस्तांतरण करता येत नाही, तथापि, सदर जमिनीतील वहिवाटादारांच्या घरांच्या दुरुस्तीला ग्रामपंचायतीकडून परवानगी दिली जाते व त्यामुळे घरे परवानगी अभावी मोडकळीस आली त्यामुळे रहिवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला, असे निदर्शनास आले नाही.

(२) हवेली तालुक्यातील मौजे खेड शिवापूर येथे गट नं. ८४६/२ ही जमीन पीर कमर अली दुर्वेश व पीर गुडजी बाबा देवस्थान इमान वर्ग - ३ यांच्या नावे असून सुमारे दिडशे ते दोनशे झोपड्यांची अतिक्रमणे आहेत. त्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी सदर अतिक्रमणाविरुध्द वक्फ अधिनियम, १९९५ नुसार कार्यवाही सुरु केली आहे.

(३) व (४) देवस्थान जमिनी (इमान वर्ग-३) च्या संदर्भात अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी तत्कालीन मा. राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने सादर केलेला अहवाल स्वीकृतीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. दरम्यान प्र.स. (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील देवस्थान संदर्भात शासनाची भुमिका ठरविण्याकरिता व शिफारशी करण्याकरिता समिती नियुक्त करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षण हक्क कायद्यानुसार काढलेल्या शासन निर्णयामुळे शिक्षकांची पदे कमी होणार असल्याबाबत

**(२१) १२४१६ (२२-१२-२०१५). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्याच्या नुसार दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे अनेक शिक्षकांची पदे कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुवर्गीय पध्दत गुणवत्तेवर परिणाम होणार तसेच विषयवार शिक्षक नेमले जाणार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षकांची पदे कमी होऊ नये तसेच बहुवर्गीय पध्दत गुणवत्तेवर परिणाम होऊ नये म्हणून शासनाने या धोरणाचा पुर्नविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०४-२०१६) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ ची अंमलबजावणी पूर्णपणे होऊन अद्यापपर्यंत सन २०१५-१६ ची संचमान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एकलव्य निवासी शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांना केंद्र शासनाच्या निवासी शाळा योजनेनुसार वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत

**(२२) १२६१७ (२३-१२-२०१५). श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या निवासी शाळा योजनेनुसार सन २०१४-१५ अखेर राज्यात किती ठिकाणी एकलव्य निवासी शाळा सुरु आहेत,

(२) सदर शाळांमध्ये ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी काम करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाच्या दिनांक ७ मे, २०१५ च्या शासन निर्णयानुसार नियमित वेतनश्रेणी केव्हापासून लागू करण्यात आली आहे,

(३) शासनाचे आदेश असूनही या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्यापही वेतनश्रेणी लागू न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०४-२०१६) :** (१) केंद्र शासनाच्या निवासी शाळा योजनेनुसार सन २०१४-१५ अखेर राज्यात ८ ठिकाणी एकलव्य निवासी शाळा सुरु आहेत.

(२) व (३) दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ पासून नियमित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

तथापि, कनिष्ठ लिपिक काम कॉम्प्युटर ऑपरेटर या पदासाठी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे या संस्थेची इंग्रजी टंकलेखनाची अर्हता संबंधित एका कर्मचाऱ्याने प्राप्त केल्यानंतर त्याला नियमित वेतनश्रेणी लागू करण्यात येईल.

---

## मुंबईतील कुपोषित बालकांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(२३) १२८९९ (२२-१२-२०१५). श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ४१३१ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई आणि परिसरातील उपेक्षित घटकांच्या कुटूंबामध्ये कुपोषणाचे वाढत्या प्रमाणाकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही तर मुंबईतील शेकडो कुटूंबे मेळघाटातील कुपोषित बालकांप्रमाणे कुपोषित ठरण्याची भिती मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील जेपी नाईक भवन सभागृहात झालेल्या एका कार्यशाळेत विविध संस्थांच्या प्रतिनिधीकडून व्यक्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील कुपोषित बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) कुपोषण निर्मुलनासाठी खालीलप्रामणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) कुपोषित मुलांची स्वतंत्र फाईल प्रत्येक अंगणवाडीत ठेवण्यात येत असून महिन्यातून दोन वेळा तीव्र कुपोषित बालकांचे वजन अंगणवाडी स्तरावर घेण्यात येते. तसेच आरोग्य तपासणीसाठी आरोग्य केंद्रात पाठविण्यात येते व वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार उपाययोजना करण्यात येते.

२) कुपोषित मुलांच्या घरी गृहभेट करुन पालकांकडून देत असलेला आहार, त्याची वेळ, आहार देण्याची पध्दत इ. बाबतची माहिती घेऊन योग्य आहार पध्दती व वेळ इ.बाबत सेविका/मुख्यसेविका यांचेकडून पालकांना मार्गदर्शन करण्यात येते.

३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लसीकरण, संदर्भसेवा इ. आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधून लाभार्थ्यांना आरोग्यविषयक सुविधा देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेद्वारे दिल्या जाणाऱ्या विविध सेवांची प्रभाविरित्या अंमलबजावणी करण्याकरिता समाज प्रबोधन व्हावे याकरिता अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका यांचेद्वारे नियमित गृहभेटी देणे, प्रकल्पस्तरावर स्तनपान सप्ताह अंतर्गत नवजात शिशुची काळजी योग्यरित्या घेणेबाबत मार्गदर्शन केले जाते, सकस आहार सप्ताह, आयसीडीएस डे, लसीकरण दिन, माता सभा या माध्यमातून प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून आवश्यक जनजागृती करणे व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्याविषयी कार्यवाही करण्यात येते.

५) विभागातील सर्व गरोदर माता तसेच बालकांच्या लसीकरणाबाबत आरोग्य विभागाशी संपर्क साधला जातो व त्याची नोंद अंगणवाडी केंद्रामध्ये घेतली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सावकारांना सेवा हमी देण्याचा सहकार विभागाने घेतलेला निर्णय**

**(२४) १२९३४ (२२-१२-२०१५). श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनतेला पारदर्शक, कार्यक्षम आणि समायोचित सेवा देण्यासाठी सेवा हमी कायद्याच्या माध्यमातून राज्यातील ११ हजार सावकारांना सेवा हमी देण्याचा निर्णय सहकार विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावकारी व्यवसायासाठी दोन महिन्यांत परवाना आणि त्याचे नुतनीकरण करून देण्याची हमी सहकार विभागाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयामुळे सावकारी व्यवसायात वाढ होणार असल्याने याबाबत पुनर्विचार करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१६) :** (१) होय,

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१४/प्र.क्र.११८/६-स, दि.१८/९/२०१५ अन्वये सावकारी व्यवसाय करण्यासाठी परवाना देणे व सावकारी व्यवसायासाठी परवाना नुतनीकरण करणे ही सेवा अधिसूचित केली आहे.

(२) सदर अधिसूचनेतील तरतूदीप्रमाणे सावकारी बाबतचा परवाना मिळणेसाठी किंवा नूतनीकरण करण्यासाठी संबंधिताने जिल्हा उपनिबंधक, सावकारी यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर दोन महिन्यांमध्ये अर्ज निकाली काढणे सेवा हमी कायद्याप्रमाणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठीचा निधी अन्यत्र वळविल्याबाबत**

**(२५) १२९८० (२२-१२-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी अनुसूचित जमाती उपयोजना राज्यात राबविण्यात येत असून राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करण्याचे शासनाचे धोरण असून त्यानुसार अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-२०१३, २०१३-१४, २०१४-१५ या मागील तीन वर्षात अनुसूचित जमाती उप योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेल्या निधीचा पुर्णपणे वापर करण्यात आला नसून त्यापैकी काही निधी अन्यत्र वळविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील तीन वर्षात वर्षनिहाय अर्थसंकल्पात किती आर्थिक तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी प्रत्यक्षात या योजनेवर किती निधी खर्च करण्यात आला, उर्वरित निधी या योजनेवर खर्च न करण्याची कारणे काय आहेत व निधी अन्यत्र वळविण्यात आला असल्यास, त्याची कारणे व तपशील काय आहे,

(४) अशा प्रकारे या योजनेचा निधी अन्यत्र वळविण्यात येऊ नये यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) गेल्या ३ वर्षातील निधींचे वितरण खालीलप्रमाणे आहे :-

१) सन २०१२-१३ मध्ये रु.३७२०.९४ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती रु.३५९२.७५ कोटी इतकी निधी वित्त विभागामार्फत वितरीत करण्यात आला. प्रत्यक्षात रु.३२७३.९७ कोटी इतकी निधी खर्च करण्यात आला असून याची टक्केवारी ९७.५०% इतकी आहे.

२) सन २०१३-१४ मध्ये रु.४१५५.०८ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती. रु.४२३२.८८ कोटी इतकी निधी वित्त विभागामार्फत वितरीत करण्यात आला. प्रत्यक्षात रु.३९७९.४२ कोटी इतका खर्च करण्यात आला असून याची टक्केवारी ९९.२३% इतकी आहे.

३) सन २०१४-१५ मध्ये रु.४८३५.३४ कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली होती. रु.४५८४.८४ कोटी इतकी निधी वित्त विभागामार्फत वितरीत करण्यात आला. प्रत्यक्षात रु.४०९०.२१ कोटी इतका खर्च करण्यात आला असून याची टक्केवारी ९४.७२% इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(२६) १३६१२ (२२-१२-२०१५). श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य रस्ते विकास महामंडळाचा ४५ कोटींचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देऊन प्रस्तावांवरील प्रलंबित कामे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) तसेच सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबत कार्यवाही केली नसल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दिनांक ३०.११.२०१५ च्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास काही प्रकल्पासाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर तालुक्यातील जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षिकेला समायोजनेंतर्गत शाळेत हजर करुन वेतन देण्याबाबत**

**(२७) १३६४६ (२२-१२-२०१५). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर तालुक्यातील जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत असलेल्या श्रीमती ज्योती मनोज पाटील, प्राथमिक शिक्षिका यांना समायोजनेंतर्गत बदली केलेल्या ठिकाणी हजर करुन घेतले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या शाळेच्या ठिकाणाहून कार्यमुक्त करत नाहीत आणि तीने शाळेत थांबू नये म्हणून शाळेच्या वर्गाला कुलूप लावणेत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद या शिक्षिकेबाबत कोणताही निर्णय न घेता निलंबनाच्या कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा परिषद कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने १८ महिन्याचा पगार न दिल्याने आर्थिक कुचंबणा होत असल्याने श्रीमती ज्योती मनोज पाटील हीने आत्महत्या करणेची नोटीस जिल्हा परिषदेस दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०६-२०१६) :** (१) व (२) नाही.
(३) दिनांक ३०.९.२०१३ च्या पटसंख्येनुसार शिक्षक निश्चितीनंतर शिक्षकांचे समायोजन करताना जिल्हा परिषद शाळा, कुरगाव येथे श्रीमती ज्योती पाटील अतिरिक्त ठरल्याने त्यांना जिल्हा परिषद शाळा रामपाड येथे पदस्थापना देण्यात आली. तथापि तेथे हजन न झाल्याने त्यांच्या समायोजनाच्या मूळ आदेशात अंशत: बदल करुन जिल्हा परिषद शाळा धोडी पूजा येथे पदस्थापना देण्यात आली. त्याअनुषंगाने मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, कुरगाव यांनी दिनांक
१६-१०-२०१४ अन्वये कार्यमुक्त करण्याचा आदेश व्यक्तिश: तसेच रजिस्टर पोष्टाने देण्याचा प्रयत्न केला. तथापि, श्रीमती ज्योती पाटील यांनी तो स्विकारला नाही. तद्नंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक ३१-१-२०१५ अन्वये नियुक्ती दिलेल्या जिल्हा परिषद शाळा धोडीपूजा येथे हजर होण्याचे आदेश दिले त्याचाही स्विकार त्यांनी केला नाही.

तद्नंतर विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार व श्रीमती ज्योती पाटील यांच्या दिनांक २०-०४-२०१५ च्या विनंती अर्जानुसार श्रीमती ज्योती पाटील यांची बदली जिल्हा परिषद शाळा सिडको कॉलनी (मराठी) बोईसर ता.पालघर येथे दिनांक २४-४-२०१५ च्या आदेशान्वये करण्यात आली होती.

पालघर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने दिनांक २६-०८-२०१५ रोजी ठराव केल्यानुसार श्रीमती ज्योती पाटील, उप शिक्षिका पालघर यांना नेमणूक दिलेल्या शाळेवर (सिडको कॉलनी मराठी शाळा बोईसर) हजर होण्याबाबत वारंवार आदेश व समक्ष सूचना देऊनही त्या हजर झालेल्या नाहीत. वरिष्ठांचे आदेश न स्विकारणे व आदेशाचे पालन न करणे, लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना चुकीची माहिती देऊनही शासनाची व प्रशासनाची दिशाभूल करणे या अनुषंगाने अंतिम कारणे दाखवा नोटिस देऊन शाळेवर हजर होण्याबाबत निर्देश दिले तथापि त्या आजतागायत हजर झालेल्या नाहीत.
(४), (५) व (६) तथापि, श्रीमती ज्योती पाटील याना डिसेंबर, २०१३ ते १४ जून, २०१४ पर्यंत व्हॉवचर नं. २४७/दि.२८-१०-२०१४ अन्वये रुपये २,६४,०१६/- (अक्षरी दोन लाख चौसष्ठ हजार सोळा रुपये मात्र) वेतन श्रीमती ज्योती पाटील यांच्या TDCC बँक शाखा बोईसर खाते क्र.०३०/८५८४ या खात्यावर जमा करण्यात आलेले आहे. त्यानंतर दिनांक १८ जून, २०१४ ते ४ सप्टेंबर, २०१४ पर्यंत ७९ दिवसाची वैद्यकीय रजा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी मंजूर करण्यात आली असून वेतन अदा करण्यासाठी गट शिक्षणाधिकारी पंचायत

समिती, पालघर यांना आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच सद्यस्थितीत त्या पदस्थापना दिलेल्या शाळेवर हजर न झाल्यामुळे त्यांना वेतन अदा करता आले नाही.

सदर काळातील वेतन मिळण्याबाबत श्रीमती ज्योती पाटील यांनी आत्महत्या करण्याची नोटीस दिली होती. त्याबाबत पोलीस स्टेशन बोईसर यांना रितसर कळविण्यात आले होते व श्रीमती ज्योती पाटील यांना समज दिलेली आहे. तसा अहवाल पोलीस स्टेशन बोईसर यांचेकडून प्राप्त झालेला आहे.

श्रीमती ज्योती पाटील या पदस्थापना दिलेल्या शाळेवर हजर झाल्यास त्यांच्या पगाराबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर करिता सहाय्यक प्राध्यापक पदांचे दायित्व स्वीकारणेबाबत**

**(२८) १३६५१ (२२-१२-२०१५). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर करिता प्रत्येकी १२ सहाय्यक प्राध्यापक पदांची पदे मंजूर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ११ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर उपरोक्त सहायक प्राध्यापक शिक्षकांना दिनांक ३१ मे, २०१२ रोजी कमी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी अनुक्रमे दिनाक २२ डिसेंबर, २०१२ व दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी निर्देश देवूनही त्याचे पालन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सहायक प्राध्यापकांच्या सेवेत कोणताही खंड न धरता सेवा सातत्य देवून वेतनावरील आर्थिक दायित्व स्वीकारणेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०५-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.६१२३/२०१२ मध्ये दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे दाखल झालेल्या अवमान याचिकेमधील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य शासनाच्या उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक २० डिसेंबर, २०१४ च्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन विद्यापीठ अनुदान आयोगाने ११ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठास मंजूर केलेल्या १२ शिक्षकीय पदांचा आर्थिक भार राज्य शासनाने स्वीकारण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत असल्याचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल झालेली याचिका क्र.४५७८/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०९ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव या विद्यापीठातील १२ शिक्षकीय पदांचा आर्थिक भार राज्य शासनाने स्वीकारण्याबाबतचा प्रस्तावही अमान्य करण्यात येत असल्याचे दिनांक ०३ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ऑलिम्पिक भवन उभारण्याचा प्रस्ताव**

**(२९) १३८९६ (२२-१२-२०१५). श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील अनेक राज्यामध्ये ऑलिम्पिक भवन आहे, त्याच धर्तीवर ऑलिम्पिक भवन उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच संदर्भात महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या माध्यमातून देखील सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे तसेच, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदन देऊन राज्यामध्ये ऑलिम्पिक भवन बांधण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१६) :** (१), (२) व (३) प्रस्तावित ऑलिम्पिक भवनासाठी पुणे शहर किंवा पुणे शहरालगत स्वतंत्र २ एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत क्रीडा संचालनालयाच्या दिनांक ०८.१०.२०१४ व २४.११.२०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविण्यात आले आहे. जागा उपलब्धतेनुसार या प्रकरणी पुढील निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

---

**अपंगांच्या स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळेतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या नियुक्ती दिनांकापासूनचा कालावधी पेंशन्ससाठी ग्राहय धरण्याबाबत**

**(३०) १३९६६ (२२-१२-२०१५). श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वयंसेवा संस्थांमार्फत अंध, मतिमंद, मुक-बधिर, अस्थिव्यंग विद्‌यार्थ्यांसाठी सन १९९२-९३ पासून अनेक शाळा सामाजिक न्याय विभागांतर्गत विनाअनुदान तत्वावर चालविण्यात येत होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा शाळांना शासनाने दिनांक १० ऑक्टोबर, २००२ पासून अनुदान तत्वावर मान्यता प्रदान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९९२-९३ पासून विनाअनुदान तत्वावर चालणाऱ्या या शाळांमधील शिक्षकांना त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून मान्यता न देता अनुदान सुरु झाल्याच्या दिनांकापासून मान्यता देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे सदर शिक्षकांची अनुदान न मिळालेला कालावधी पेंशनसाठी ग्राहय धरण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ह्या प्रकरणी विनाअनुदानित कालावधीतील शिक्षकांची सेवा पेंशनसाठी ग्राहय धरण्याबाबत संघटनेतर्फे व नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदन देऊन

मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास या प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०४-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) होय.
(५) व (६) शासन निर्णय दि.१.३.१९८४ अन्वये अपंगांच्या अनुदानित शाळेमधील कर्मचाऱ्यांची अनुदान तत्वावर मान्यता दिल्यानंतरची सेवानिवृत्तीसाठी ग्राहृय धरली जाते, विनाअनुदानीत सेवा ग्राहृय धरली जात नाही.

---

**दि. पुना क्लब ली., पुणे चे नुतनीकरण करण्याबाबत**

**(३१) १३९६९ (२१-१२-२०१५). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दि. पुना क्लब ली., पुणे या जागेवरील भाडे करार हा २०१२-१३ रोजी संपलेला आहे व तो आजपर्यंत नुतनीकरण झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, पुणे यांनी मागील २ वर्षांचे प्रतीवर्षी १०० कोटी रुपयापेक्षा जास्त भाड्याच्या रक्कमेची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुना क्लबची आजीवन सभासद फी २० ते ३० लाख रुपये इतकी असताना शासकीय अधिकाऱ्यांना केवळ काही हजार रुपयांमध्ये प्रती वर्षी ५ अधिकारी याप्रमाणे आजीवन सभासदत्व देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रतीवर्षी ५ अधिकाऱ्यांना आजीवन सभासदाऐवजी प्रतीवर्षी १५ सभासद घेण्याची अट टाकून पुना क्लबची हजारो कोटी रुपयांची मध्यवर्ती ठिकाणी असलेली जागा कुठलेही सार्वजनिक हीत न जपता नुतनीकरणाचा प्रस्ताव शासनाने पुना क्लबला दिलेला आहे काय,
(५) असल्यास, पुना क्लब ली., ची संपूर्ण जागा ही शासनाच्या मालकीची असून त्याचे नुतनीकरण करताना शासनाने तेथे सर्वसामान्य नागरीकांना व लोकप्रतिनिधींना प्रवेश देण्याची व क्लबच्या सुविधा उपभोगण्याची अट टाकणार आहे काय,
(६) असल्यास, मागील करारातील बऱ्याचशा अटीचे उल्लघंन पुना क्लबने केल्याने शासनाची शेकडो कोटी रुपयाचे नुकसान झालेले आहे ते झालेले नुकसान शासन कशाप्रकारे वसूल करणार आहे किंवा ती जागा शासन स्वत:च्या ताब्यात घेणार आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०४-२०१६) :** (१) पुना क्लब लि. यांना पूर्वी भाडेपट्ट्याने दिलेल्या बंडगार्डन रोड येथील शासकीय जमिनीचा भाडेपट्टा सन २०१३ मध्ये व मौजे येरवडा येथील शासकीय जमिनीचा भाडेपट्टा सन २००७ मध्ये संपलेला आहे. सदर दोन्ही जमिनीच्या भाडेपट्ट्यास शासन ज्ञापन दि.३०/११/२०११ व दि.१२/०७/२०१३ अन्वये ३१/७/२०३७ पर्यंत काही अटी/शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर शासन ज्ञापनामधील निर्देशांनुसार भाडेपट्टा

नुतनीकरण करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सुरु आहे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालयाने दि.०४/११/२०१५ च्या पत्रान्वये विषयांकित जमीन भाडे कराराविना सदर संस्थेच्या ताब्यात राहिल्याने सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाच्या बाजारमुल्याच्या रक्कमेच्या प्राईम लेंडींग दरानुसार १०% प्रमाणे होणारी रक्कम रुपये २३४,७९,८१,८१८/- भाडे रक्कमेपोटी शासन जमा करण्याबाबत पुना क्लब लि. यांना कळविले आहे.

(३) दि.३०/११/२०११ व दि.१२/०७/२०१३ रोजीच्या शासन ज्ञापनांमध्ये जिल्हाधिकारी, पुणे हे शिफारस करतील अशा किमान १५ अधिकाऱ्यांना प्रतीवर्षी संस्थेचे कायमस्वरुपी सदस्यत्व देणे पुना क्लबवर बंधनकारक असलेबाबतची अट विहित केली आहे. मात्र सदस्यत्व फी बाबतचा निर्णय पुना क्लब लि. यांच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात येतो.

(४) पुना क्लब लि. यांना पूर्वी भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्ट्यास शासन ज्ञापन दि.३०/११/२०११ व १२/०७/२०१३ अन्वये सन २०३७ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. सदर बाब महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४० च्या अनुषंगाने शासनाच्या अधिकारीतेत आहे.

(५) विषयांकित जमिनीच्या भाडेपट्ट्यास वरीलप्रमाणे सन २०३७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून त्यामध्ये अशी अट समाविष्ट नाही.

(६) पुना क्लब लि. यांनी भाडेकरारातील अटी/ शर्तीच्या केलेल्या उल्लंघनाबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी रुपये २,५३,३९,५२४/- इतकी दंडात्मक रक्कम शासन जमा करणेबाबतचा आदेश पारीत केला असून त्यानुसार पुना क्लब लि. यांनी दंडात्मक रक्कम शासन जमा केली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बदलापूर पूर्व (जि. ठाणे) येथे राज्य परिवहन महामंडळाचा एसटीडेपो सुरू करण्याबाबत**

**(३२) १४११९ (२१-१२-२०१५). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर पूर्व (जि. ठाणे) येथे राज्य परिवहन महामंडळाचा एसटी डेपो सुरू करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त एसटी डेपो किती कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी एसटी डेपो उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०६-२०१६) :** (१) व (२) बदलापूर येथे नविन आगार प्रस्तावित नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळाने बदलापूर येथे सन १९९०-९१ साली मिनीबसस्थानकाचे बांधकाम पूर्ण करुन वापरात आणले आहे. येथून जाणाऱ्या ८६ फेऱ्या चालनात असून बसस्थानकावर उपलब्ध सुविधा पुरेशा आहेत. आर्थिक व्यवहार्यता नसल्याने तसेच महामंडळाच्या आगार निर्मिती विषयी मार्गदर्शक तत्वानुसार कल्याण व विठ्ठलवाडी ही आगारे

अनुक्रमे १४ व १२.०६ कि.मी. अंतरावर असून तेथील नियते १०० पेक्षा कमी असल्याने आगार निर्मिती विषयक धोरणाशी सुसंगत नसल्याने बदलापूर येथे नविन आगार प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानखुर्द (मुंबई) येथे योग्य ठिकाणी सब-वे बांधण्याबाबत**

**(३३) १४१३४ (२२-१२-२०१५). श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द (मुंबई) येथे आवश्यकता नसतांना अयोग्य ठिकाणी एमएसआरडीसीने सब-बे बांधल्याने सदरहू सबवे विनावापर पडून असून कोट्यवधी रुपये कंत्राटदाराला अनावश्यक द्यावे लागले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्राधिकरणाने आवश्यक ठिकाणी सब-वे बांधण्याकरिता प्राधान्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बेघर आदिवासींना घरे देण्याबाबत**

**(३४) १४१८२ (२२-१२-२०१५). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बेघर आदिवासींसाठी शासन येत्या पाच वर्षात ७० हजार घरे बांधणार असल्याची मा. मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घोषणेनुसार शासनाने निर्णय घेवून बेघर आदिवासींना घरे बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०५-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना कक्षाचे रुपांतर “राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्षामध्ये” करण्यास मान्यता दिलेली आहे. या कक्षाद्वारे ग्रामविकास

व जलसंधारण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग व राज्य शासनाच्या विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व ग्रामीण घरकुल कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यात येणार आहे.

---

**नव्या विचारांची शासकीय यंत्रणेशी सांगड घालण्यासाठी**
**मुख्यमंत्री इंटर्नशिप उपक्रम सुरु करण्याबाबत**

**(३५) १४२१८ (२३-१२-२०१५). श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या विचारांची शासकीय यंत्रणेशी सांगड घालण्यासाठी मुख्यमंत्री इंटर्नशिप उपक्रम सुरु करण्यात आला असून तरुणाईच्या अशा आकांक्षाचे प्रतिबिंब शासनाच्या ध्येयधोरणात पुरेपुर उमटण्यासाठी या उपक्रमाचा निश्चितच उपयोग होईल असे प्रतिपादन मा. मुख्यमंत्री यांनी केले असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा उपक्रम कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे. राज्यातील तरुणांना प्रशासनात सहभागी होण्याची संधी उपलब्ध व्हावी, युवकांचा उत्साह, नाविन्यपूर्ण कल्पना यांचा प्रशासनात उपयोग व्हावा आणि त्यामधून शासकीय यंत्रणेतील कामकाज त्यातील घटकांचा ताळमेळ व निर्णय प्रक्रिया याचा तरुणांना थेट अनुभव मिळावा, त्यातून समर्पित वृत्तीने समाजसेवा करण्यासाठी प्रामाणिक, ध्येयवादी, सुजाण नागरीक तयार व्हावेत या हेतूने मुख्यमंत्री यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये "मुख्यमंत्री इंटर्नशिप" कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निदेश दिले होते.

(२) "मुख्यमंत्री इंटर्नशिप" कार्यक्रमाबाबत विविध विभागांशी विचार विनिमय करून धोरण अंतिम होईपर्यंत प्रायोगिक तत्वावर सिडको, एमएमआरडीए, एमआयडीसी, एमकेसीएल व टाटा ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ पासून ३६ विद्यार्थ्यांची निवड करून मुख्यमंत्री इंटर्नशिप कार्यक्रमांतर्गत ११ महिन्यांसाठी पुढील कार्यालयात नेमणूक करण्यात आली आहे.

सिडको-३, एमआयडीसी-२, एमटीडीसी-२, एमएसईडीसीएल-२, मुख्यमंत्री सचिवालय-१२, (शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांना चालना देण्यासाठी सुरु केलेल्या सीएम वॉर रुम, कौशल्य विकासासंबंधी व सामाजिक क्षेत्राशी निगडीत योजनांचा अभ्यास करणे) जलसंधारण विभाग-१, अन्न व नागरी पुरवठा विभाग-१, महानगरपालिका, पुणे, नागपूर व औरंगाबाद प्रत्येकी-१ अशी एकूण -३ तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, नाशिक, अहमदनगर, नागपूर, सोलापूर, औरंगाबाद, सातारा, अमरावती, पुणे, वर्धा प्रत्येकी-१ अशी एकूण -१० अशी इंटर्नची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच सदर कार्यक्रम आता "मुख्यमंत्री फेलोशिप" म्हणून नियमितपणे

नियोजन विभागाच्या अधिपत्या खालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत राबविण्याची कार्यपध्दती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.४००/२०१४/१२, दिनांक २९ मे, २०१५ अन्वये निर्धारीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमळनेर (जि.जळगाव) तालुक्यात अवैध वाळू उपसा व वाहतूक होत असल्याबाबत**

**(३६) १४३०१ (२१-१२-२०१५). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील हिंगोणे, जळोद, सावखेडा व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा व त्याची वाहतुक तसेच अधिकृत लिलावधारकांची वाहतुक यामुळे रस्त्यांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधी व नागरीकांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०४-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार अमळनेर यांनी वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीबाबत कारवाई करुन माहे एप्रिल, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ८४ प्रकरणात रुपये ९,९७,६००/- इतका दंड वसूल केला आहे.

तहसिलदार अमळनेर यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अमळनेर यांनी रस्ते दुरुस्त करण्याबाबत कळविल्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जळगांव यांना कळविल्यानुसार परिवहन विभागाने २ वाहनांवर कारवाई करुन तडजोड शुल्क वसुल केले असून, ६० दिवसांसाठी नोंदणी निलंबित केली आहे. उर्वरित वाहनांवर कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपळगाव-नाशिक-गोंदे (जि.नाशिक) या सहापदरी महामार्गावरील अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत**

**(३७) १४३९९ (२३-१२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८०८६ ला दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव-नाशिक-गोंदे (जि.नाशिक) या सहापदरी महामार्गावरील अपुर्ण काम तसेच नाशिक शहरात द्वारका सर्कल, इंदिरानगर इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणात होत असलेली वाहतुक कोंडी या समस्येच्या पार्श्वभुमीवर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी वाहतुक समस्या व त्यानुषंगाने पर्यायी उपाय यांची पडताळणी करण्यासाठी खाजगी

सल्लागाराची नेमणुक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सल्लागारांनी राष्ट्रीय महामार्ग-३ अंतर्गत नाशिक शहरातील द्वारका व इंदिरानगर येथील रस्त्याची पहाणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) सद्यस्थितीत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे विचाराधिन असल्यास, प्रस्तुत अहवालावरील कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) सदर मार्गावरील अपूर्ण काम केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१६) :** (१) केंद्र शासनाच्या अधिनस्थ असलेल्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत नाशिक शहरातील, विशेषत: द्वारका सर्कल व इंदिरानगर येथील, राष्ट्रीय महामार्ग ३ वरील वाहतुकीचा अभ्यास करुन वाहतूक सुरळित होण्यासाठी आवश्यक उपाय सुचविण्यासाठी मे.व्हि.आर.टेक्नीक, नोयडा या तज्ञ वाहतूक सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली होती.
(२) संबंधित सल्लागारांनी अंतिम अहवाल दिनांक १६/९/२०१५ रोजी प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांना सादर केलेला आहे.
(३), (४) व (५) सदरील अहवालामध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणा व त्यांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | ठिकाण व प्रस्तावित सुधारणा | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | द्वारका सर्कल | |
| | तात्पुरती उपाययोजना : मुख्य सर्कल व चारही दिशेच्या वाहतूक बेटांचा आकार कमी करुन सर्व्हीस रोडचे रुंदीकरण करणे. | काम पूर्ण |
| | कायमस्वरुपी उपाययोजना : मुख्य सर्कल काढून दोन पियर्समध्ये २५ मी. ओपनिंग देणे, धुळे व मुंबई कडे "यू टर्न" व्यवस्था करणे, रा.म.मा.५० वर सिग्नल व्यवस्था, मुंबई नाक्याकडे जाण्यासाठी मुक्त रस्ता व द्वारका भुयारी मार्गावरुन पुण्याला जाण्यासाठी रस्ता बांधणे | स्वतंत्र अभियंत्यांकडून प्रस्ताव मागविला असून नाशिक महानगरपालिकेला अतिक्रमणे व सेवा वाहिन्या हटविण्याबाबत विनंती केली आहे. |
| २ | इंदिरानगर | |
| | मुंबई नाक्याच्या बाजूला पियर १७१ व १७२ मधून मुंबईकडे "यू टर्न" व्यवस्था करणे, इंदिरानगरच्या भुयारी मार्ग बंद करणे, इंदिरानगरकडे जाणारे सर्व्हीस रोड एक दिशा मार्ग करणे. | काम पूर्ण |

| | | |
|---|---|---|
| | लेखा नगर उड्डाण पुलाच्या पहिल्या गाळ्यामधून "यु टर्न" व्यवस्था करणे, इंदिरानगर नाक्यावरील सर्व चारही बाजूच्या सेवा रस्ते व मुख्य रस्त्यामधील दुभाजक काढणे | वाव बदल प्रस्ताव (COS) एन.एच.ए.आय. च्या दिल्ली येथील मुख्यालयास सादर. |
| ३ | मुख्य रस्त्यावर प्रवेश व बाहेर जाण्यासाठी मार्ग | |
| | गॅब्रियल कंपनीजवळ द्वारकाकडे जाण्यासाठी मुख्य रस्त्याला प्रवेश | वाव बदल प्रस्ताव (COS) एन.एच.ए.आय. च्या दिल्ली येथील मुख्यालयास सादर. प्रस्ताव तयार करणे प्रगतीत. |
| | हॉटेल सेव्हन हिल जवळ मुंबईकडे जाण्यासाठी मुख्य रस्त्याला प्रवेश मुख्य रस्त्यावरुन सेवा रस्त्याला जाण्यासाठी बाह्य मार्ग | |
| | स्टेट बँक चौकात द्वारकाकडे जाण्यासाठी मुख्य रस्त्याला प्रवेश | |
| ४ | स्टेट बँक चौक, सिडको व पंचवटी महाविद्यालयाजवळ पादचाऱ्यांसाठी भुयारी मार्ग बांधणे | वाव बदल प्रस्ताव (COS) एन.एच.ए.आय. च्या मुंबई कार्यालयास सादर. |

(६) वाव बदल (COS) प्रस्तावास भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या दिल्ली येथील मुख्यालयाकडून मंजूरी मिळताच उर्वरीत कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात येतील असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

---

**राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची होणारी अडवणूक**

**(३८) १४४११ (२३-१२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७७५० ला दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची होणारी अडवणूक विचारात घेता, शासनाने पणन विभागाचे कालबाह्य झालेले नियम बदलण्याबाबत माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतलेल्या निर्णयाचे अनुषंगाने कायद्यातील दुरुस्ती संदर्भातील प्रस्तावावर विधी व न्याय विभागाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे काय, असल्यास, दुरुस्तीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, प्रस्तुत कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०५-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

(३) पणन कायद्यात दुरुस्ती करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासन स्तरावर विचारविनिमय सुरु

आहे. तद्नंतर प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात येईल.

---

**शिवाजीनगर (जि.पुणे) जिल्हा न्यायालयातील उद्वाहनाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(३९) १४७६५ (२७-०४-२०१६). आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (जि. पुणे) जिल्हा न्यायालयासाठी निधी मंजूर होऊनही अद्याप तेथील उद्वाहनाचे काम सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्वाहनाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१६) :** (१) व (२) शिवाजीनगर (जि.पुणे) जिल्हा न्यायालयाचे उद्वाहनाचे काम सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे.

सदरच्या कामास दिनांक ५/१०/२०१५ रोजी प्रशासकीय मंजूरी मिळाली. त्यानंतर तांत्रिक मंजूरी व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक ३०/१२/२०१५ रोजी मे.ओटीस इलेव्हेटर्स कं. (इंडिया) लि, पुणे यांना कार्यादेश देणेत आले. सदरच्या कामाकरिता दिनांक १९/१/२०१६ रोजी रुपये ४६,१३,९९६/- इतका निधी मा.जिल्हा न्यायालय, पुणे यांचेकडून वर्ग करणेत आला. त्यानंतर माहे फेब्रुवारी, २०१६ पासून कामास सुरुवात झाली असून, दि. ४/५/२०१६ पर्यंत २ उद्वाहनाचे काम पूर्ण झाले आहे. दि. ३१/५/२०१६ पर्यंत उर्वरित १ उद्वाहनाचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. काम पूर्ण झालेली २ उद्वाहने मा.जिल्हा न्यायालय, पुणे यांना दैनंदिन वापराकरिता हस्तांतरीत केली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय मुद्रणालयातील भरतीबाबत**

**(४०) १५२५२ (२७-०४-२०१६). श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय मुद्रणालयातील कर्मचारी भरती व मुद्रणालयात लागणारे साहित्य कशाप्रकारे खरेदी केले जाते,

(२) उपरोक्त दोन्ही प्रकरणी गैरव्यवहार झाल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण संघाने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१९-०५-२०१६) :** (१) (अ) राज्यातील शासकीय मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांची भरती शासनाने वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात येते.

(ब) शासकीय मुद्रणालयाला लागणारे साहित्य, शासनाच्या दिनांक ०२/०१/१९९२ च्या शासन

निर्णयान्वये तसेच दिनांक ३०/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार यासाठी गठीत करण्यात आलेल्या भांडार खरेदी समिती व मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयाच्या कार्यालयीन समितीमार्फत करण्यात येते.

(२) होय. शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयाच्या अधिपत्याखालील मुद्रणालयामध्ये झालेल्या भरतीबाबत व मुद्रणालयासाठी करण्यात आलेल्या यंत्रसामग्री खरेदीबाबत महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २०/०२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये तक्रार केली आहे.

(३) महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात कोणतेही पुरावे सादर केलेले नाहीत. तसेच या संदर्भात चौकशी केली असता कोणतेही तथ्या आढळून आलेले नाही. सदरची बाब महासंघास दिनांक ०५/०५/२०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे.

---

**राज्यातील रस्ते खड्डेमुक्त करण्याबाबत**

**(४१) १८१२२ (२७-०४-२०१६). श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०६-२०१६) :**(१) (२) व (३) अशी बाब नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील महत्वाच्या रस्त्यांवरील खड्डे मे २०१६ पर्यंत भरण्याची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील प्र.रा.मा. तसेच रा.मा. दर्जाच्या रस्त्यांवरील खड्डे भरण्याची कामे ९८% व प्र.जि.मा. दर्जाच्या रस्त्यांवरील ८३% पुर्ण झाले आहे. रस्त्यावरील उर्वरीत खड्डे भरण्याची कामे निधि निकष व प्राधान्यक्रमनुसार हाती घेवुन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**केसरी शिधापत्रिका धारक लाभार्थीना स्वस्त दरात धान्य उपलब्ध करून देणेबाबत**

**(४२) १८५९६ (२९-०४-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांकः ११५७८ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केसरी शिधा पत्रिकाधारक लाभार्थी असलेल्या व राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या १ कोटी ७७ लाख लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याच्या विचाराधिन प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१४ नंतर अन्नधान्याचा पुरवठा न झालेल्या आणि प्राधान्य कुटूंब लाभार्थ्यांमध्ये समावेश नसलेल्या उक्त लाभार्थ्यांना स्वस्त दरात जीवनावश्यक वस्तु उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत काय,
(३) नसल्यास, दुष्काळाची तीव्रता व वाढता महागाई निर्देशांक विचारात घेता शासनाचा प्रस्तुत बाबींवरील विचार केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीश बापट (०४-०६-२०१६).** (१), (२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभ मिळण्यास पात्र न ठरलेल्या एपीएल (केशरी) गटातील लाभार्थ्यांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पूर्वीच्या ए.पी.एल दराने व परिमाणात माहे मे, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत केंद्र शासनाकडून Economic Cost ने धान्याची खरेदी करुन त्या लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध करुन दिले आहे. परंतु, राज्यातील शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या परंतु लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पुर्वी लाभ घेत असलेल्या १७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असा शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी निर्गमित केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयात पिण्याच्या पाण्याच्या योजना बंद असल्याबाबत**

**(४३) १८९८७ (२९-०४-२०१६). श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ७८६४ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयात माहे जानेवारी, २०१६ पासून पिण्याच्या पाण्याच्या बहुतांश योजना बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच जिल्हयात काही पाणी पुरवठ्याच्या योजना ग्रामीण पुरवठ्याच्या समितीच्या अपहारामुळे बंद पडल्या तर काही योजना निधी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार गैरव्यवहारामुळे बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनेस जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच, जिल्हयातील ग्रामीण नळ पाणी पुरवठा गैरव्यवहारामुळे व निधी अभावी बंद असलेल्या योजनांची कामे करून जिल्हयातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०६-२०१६) :**(१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

जिल्हयात एकूण १२४२ नळ योजना असुन त्यापैकी १०७ योजना सदयस्थितीत बंद आहेत.

योजनांची काल मर्यादा, स्त्रोत निकामी होणे, देखभाल दुरुस्ती व समितीअंतर्गत

असलेल्या वादामुळे एकूण ८० योजना बंद असून वीज देयकाच्या थकीत रक्कमेमुळे २७ योजना बदं आहेत.

(३) होय.

चौकशी करण्यात आली असून संबंधितांकडून मुल्यांकनापेक्षा जादाची उचल केलेली रक्कम वसूल करण्यात येऊन योजनांची कामे सुरु करण्यात आलेली आहेत. (१) खेड, ता.आर्णी (२) तिवसाळा, ता.घाटंजी व (३) भिसणी, ता.यवतमाळ या तीन गावच्या समित्यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांचे विरुध्द FIR दाखल करण्यात आले आहेत. सदर तीनही गावांमध्ये पिण्याची पाण्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहे.

वीज देयक थकीत असलेल्या योजनांपैकी ६ योजनांची देयके संबंधित ग्रामपंचायती कडून भरुन घेण्यात आली असुन त्यांचा पाणी पुरवठा सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय तसेच महापालिका वैद्यकिय महाविद्यालयात रिक्त पदे असल्याबाबत**

**(४४) २३४२८ (२०-१२-२०११). डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकिय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय तसेच महापालिका वैद्यकीय महाविद्यालयात रिक्त असलेल्या पदांची माहिती वैद्यकिय शिक्षण विभागाने सादर करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिल्याचे माहे ऑगस्ट, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय तसेच महापालिका वैद्यकिय महाविद्यालयात किती जागा रिक्त आहेत,

(३) असल्यास, सदरच्या रिक्त जागा भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. या संबंधित याचिकावरील सुनवाणीदरम्यान मा.न्यायालयाने रिक्त पदांची माहिती पुढील सुनावणीच्या वेळी सादर करण्याच्या सूचना/आदेश दिले होते.

(२) दिनांक २९/८/२०११ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी खालीलप्रमाणे रिक्त पदांची माहिती सादर करण्यात आली होती.

१) आरोग्य सेवा संचालनालयाच्या अखत्यारितील वैद्यकिय अधिकाऱ्यांची १८५९ रिक्त पदे,

२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकिय महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांची ११७ रिक्त पदे व वैद्यकिय अधिकाऱ्यांची २९ रिक्त पदे,

३) वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील सहायक प्राध्यापकांची ११९ रिक्त पदे व वैद्यकिय अधिकाऱ्यांची ७६ रिक्त पदे.

(३) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार संचालनालयामार्फत सदरची पदे भरण्याची निवड प्रक्रिया

राबविण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारितील पदे निवड मंडळामार्फत भरण्याची प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नृसिंह कन्स्ट्रक्शन कंपनी या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदाराव कंपनीची चौकशी करणेबाबत**

**(४५) ४१९२६ (१६-०८-२०१३). श्री.अमरसिंह पंडीत, विनायकराव मेटे : दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ३४६९३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नृसिंह कन्स्ट्रक्शन कंपनी या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदार कंपनीची चौकशी करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी सचिव (रस्ते) यांचेकडे दिनांक ५ मार्च, २०११ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे दोन वर्षापूर्वी दिलेल्या तक्रारीची चौकशी प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय, चौकशीमध्ये कंत्राटदाराच्या कोणकोणत्या कामाची व तक्रारीतील कोणकोणत्या मुद्दयानुसार चौकशी करण्यात आली आहे,
(३) असल्यास, चौकशी दरम्यान अभिलेखे वेळेत उपलब्ध न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच संबंधित कंत्राटदार कंपनीविरुध्द सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत विभागाने कोणत्या स्वरुपाची चौकशी अथवा कारवाई केली आहे, चौकशीचे निष्कर्ष कोणते आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१६) :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी आदेशित करण्यात आली असून, प्राप्त अहवालानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागझरी (ता.अंबड, जि.जालना) या गावाला रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४६) ४६४६१ (१७-०१-२०१४). श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागझरी (ता.अंबड, जि.जालना) येथील दुधनाच्या तीरावर तीस वर्षापूर्वी "पाणी अडवा, पाणी जिरवा" या उद्देशाने कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यात आला, असून विद्यार्थ्यांना

बाहेरगावी शिक्षणासाठी व ग्रामस्थांना दळणवळणासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी व ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून व बंधाऱ्यावर जावे लागत असल्यामुळे ग्रामस्थांनी मागील अनेक वर्षापासून संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी रस्ता उपलब्ध करण्यात आला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावाला रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच या गावाला रस्ता उपलब्ध करुन देण्यास दुर्लक्ष व टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिकेच्या प्रतिनिधींना पथकरातून सूट देण्याबाबत**

**(४७) ४६५४४ (१५-०१-२०१४). श्री.मितेश भांगडिया : सार्वजनिक उपक्रम मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व इतर मार्ग यांचे बांधकाम, दुरुस्ती व देखभाल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व खाजगी अभिकर्त्यामार्फत केली जातात, रस्ते बांधल्यानंतर त्यावर पथकर लावण्यात येतो या पथकरातून लोकप्रतिनिधींना सुट देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महानगरपालिका, जिल्हापरिषद, नगरपालिकेच्या प्रतिनिधींना पथकरातून सुट देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रतिनिधींना शासकीय कामानिमित्त किंवा त्यांच्या मतदार संघातील समस्या निवारणाकरीता दौरे करावे लागतात. ज्या अर्थी महाराष्ट्रातील प्रतिनिधींना पथकरातून सुट देण्यात येते त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रतिनिधींना पथकरातून सुट देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०१६) :** (१) मा.विद्यमान संसद सदस्य, राज्याचे विद्यमान तसेच विधानसभा व विधानपरिषद सदस्य अशा जनप्रतिनिधींनाच पथकरातून सुट देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) नाही.

---

**मंजरथ (खुर्द) ता.पाथरी, जि.परभणी येथील दळणवळणाची वापर होत असलेल्या होडीचा प्रवास बंद केल्याबाबत**

**(४८) ४७९५७ (२०-०१-२०१४). श्री.जंयत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंजरथ (खुर्द) (ता.पाथरी, जि.परभणी) येथील विद्यार्थी पुढील शिक्षण घेण्यासाठी गोदावरी नदीच्या पात्रातून दुसऱ्या तिरावरील मंजरथ येथे जाण्यासाठी होडीचा वापर करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी नदीवर गतवर्षी बंधारा तहसिलदार पाथरी यांच्या आदेशाने ही होडी सेवा बंद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी शासनाने विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी व शिक्षणापासून हे विद्यार्थी वंचित राहू नयेत म्हणून पर्यायी कोणती व्यवस्था केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२२-०३-२०१६) :** (१) नाही.

(२) खरे आहे.

(३) परभणी जिल्ह्यात मंजरथ (खु.) ता.पाथरी, जि.परभणी येथील पाथरी तहसिदार यांनी सुरक्षेच्या कारणास्तव होडी सेवा बंद केली आहे. परंतु उच्च पातळी बंधारा असल्यामुळे विद्यार्थी बंधाऱ्यावरुन पायी, सायकल, मोटारसायकल, ऑटो इ.च्या माध्यमातून ये-जा करतात.

---

**गेवराई (जि.बीड) तालुक्यातील निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांच्या कामाबाबत**

**(४९) ४९४२५ (०१-०७-२०१४). श्री.अमरसिंह पंडीत, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुका युवा पत्रकार संघाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ रोजी चुकलांबा ते श्रृंगारवाडी रस्त्याच्या कामाबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रकार संघाच्या तक्रारीबाबत कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या चौकशीच्या निष्कर्ष कोणते आहेत,

(३) असल्यास, चौकशीमध्ये दोषी आढळलेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०४-२०१६) :** (१) होय.
(२) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांचे अहवालानुसार कामाची गुणवत्ता सर्वसाधारण पणे योग्य असल्याचे नमूद केले आहे,
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजभाषेच्या विकासासाठी व दिर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(५०) ४९४८० (०३-०७-२०१४). श्री.जयवंतराव जाधव, अनिल भोसले, अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजभाषेच्या विकासासाठी व दिर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) मराठी अभ्यासकेंद्राने राज्यभाषा मराठी विभागाच्या पुनर्रचनेसाठी पाठविलेला प्रस्ताव माहे एप्रिल, २०१० पासून तब्बल दहा वेळा शासनास सादर करुनही शासनाने कोणताही निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) तसेच मराठी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) मराठी भाषेचा लोकभाषा म्हणून विकास करण्यासाठी व मराठी भाषेची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०४-०६-२०१६) :** (१) होय.
(२), (३) व (४) मराठी अभ्यास केंद्राचा प्रस्ताव तसेच मराठी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.